जाहीर नोटीस (१)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे चिखली** येथील **गट नं. १५९४ पै.** मधील **श्री. गिताराम दगडू मोरे** यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रुंद रस्ता या प्रयोजनाने बाधित क्षेत्र ३३५.८७ चौ. मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

**मौजे चिखली , गट नं. १५९४ पै., १८.०० मी. रुंद रस्ता ( बाधित क्षेत्र - ३३५.८७ चौ. मी. )**

**उत्तरेस :- लागू गट नं. १५९४ पै. ची मिळकत.**
**पुर्वेस :- लागू गट नं. १६५२ ची मिळकत.**
**दक्षिणेसः- लागू गट नं. १५९४ पै. ची मिळकत.**
**पश्चिमेस:- लागू गट नं. १५९४ पै. ची मिळकत.**

परिशिष्ट २)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे डूडूळगाव** येथील गट नं. १०० पै मधील **मे. विलास जावडेकर इको होम्स तर्फे भागीदार अदित्य विलास जावडेकर** यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रस्ता रुंदी या प्रयोजनाने बाधित होणारे ५११.०० चौ. मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे डूडूळगाव , गट नं. १०० पै , १८.०० मी. रस्ता रुंदी :- ( बाधित क्षेत्र- २३८.०० चौ. मी. )
उत्तरेस :- लागू गट नं. १०१ ची मिळकत.

पुर्वेस :- लागू गट नं. १०० पै. ची मिळकत .

दक्षिणेस :- लागू गट नं. ९९ ची मिळकत.

पश्चिमेसः- लागू गट नं. १०० पै. मधिल आस्तित्वातील रस्ता.

मौजे डूडूळगाव , गट नं. १०० पै , १८.०० मी. रस्ता रुंदी :- ( बाधित क्षेत्र- २७३.०० चौ. मी. )

उत्तरेस :- लागू गट नं. १०१ ची मिळकत.

पुर्वेस :- लागू गट नं. १०० पै. मधिल आस्तित्वातील रस्ता.

दक्षिणेस :- लागू गट नं. ९९ ची मिळकत.

पश्चिमेसः- लागू गट नं. १०० पै. ची मिळकत

परिशिष्ट ३)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे रावेत** येथील स.नं. ६०/१ सौ. उज्वला महावीरचंद मरलेचा यांचे मिळकतीमधील मंजूर विकास योजनेतील २४.०० मी रूंद रस्ता या प्रस्तावाने बाधित होणार एकूण क्षेत्र २००.०० चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे –

चतु:सिमा:-

मौजे रावेत येथील स.नं. ६०/१ २४.० मी. रस्त्याची
चतु:सिमा : (बाधित क्षेत्र २००.०० चौ.मी.)

उत्तरेस :- स. नं. ६० पैकी मिळकत.

पुर्वेस :- स. नं. ६० पैकी मिळकत.

दक्षिणेस :- स. नं. ६० पैकी मिळकत.

पश्चिमेसः- स. नं. ६० पैकी मिळकत.

परिशिष्ट ४) - मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरीचिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे च-होली येथील स.नं. ४१८ पै. (जुना स.नं. ४७४पै.) मधील १) मे. बालाजी लॅण्डमार्क्स प्रा.लि. तर्फे संचालक श्री. संतोष विठ्ठलदास कर्नावट,२)दिलीप सोहनराज जैन यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील ३०.०० मी. रस्ता या प्रस्तावाने बाधित क्षेत्र ४१२.००चौ.मी जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा-

| | |
|---|---|
| उत्तरेस :- | लागू नाला |
| दक्षिणेसः- | स.नं. ४१८ पै. |
| पुर्वेस :- | स.नं. ४१८ पैकीची मिळकत |
| पश्चिमेस :- | स.नं. ४१८ पैकीची मिळकत |

परिशिष्ट ५) - मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे मोशी येथील नविन गट नं. ७०६ पै. (जुना गट नं. १४४९ पै.)** मधील **श्री. विश्वनाथ दामु बोराटे व इतर ३ यांचे तर्फे** कुलमुखत्यारपत्रधारक मे. रचना कन्स्ट्रक्शन तर्फे प्रो.प्रा. श्री. संजय मन्मथ तोंडारे यांच्या मिळकती मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील योजनेतील ६०.०० मी. रस्ता रूंदी या प्रस्तावाने बाधित होणारे २००.०० चौ.मी., जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे-

चतु:सिमा :-

उत्तरेस:- गट नं. ७०६ पैकीची उर्वरित मिळकत
पुर्वेस :- गट नं. ७०७ पैकीची मिळकत
दक्षिणेस लागू गावठाण
पश्चिमेस :- लागू रस्ता

परिशिष्ट ६) - मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे किवळे येथील स.नं. ६६/१/२ पै.** येथील **श्री. राकेश फुलचंद सोनिगरा** यांच्या मिळकती मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील आ.क्र.४/१०३ (SWT) सॉलिड वेस्ट ट्रान्स्फर साईट या प्रस्तावाने बाधित होणारे १८३.७५ चौ.मी. व बांधकाम अयोग्य क्षेत्र ६३.२५ चौ.मी. असे एकुण २४७.०० चौ.मी., जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे-

चतु:सिमा :-

उत्तरेस:- लागु रस्ता
पुर्वेस :- स.नं.६६ पैकी मिळकत
दक्षिणेस :- स.नं.६६ पैकी मिळकत
पश्चिमेस :- लागु रस्ता

**मिळकतीचे वर्णन–७)** तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, मौजे रावेत येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीतील स.नं. १७।३।१ मधील मे. तालसन्स मोटर्स तर्फे श्री. सरल सुनिल तलवार यांच्या मालकीच्या मिळकतीतील मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. ४।७९, स्मशानभुमी व १२.०० मी. रुंद सेवा रस्त्याने बाधित क्षेत्र एकुण ४३११.२० चौ.मी. (आरक्षण क्र. ४।७९ स्मशानभुमी ४००० चौ.मी. व १२.०० मी. रुंद सेवा रस्ता ३११.२५ चौ. मी.) जमीन त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

**चतु:सिमा – मौजे रावेत, स.नं. १७।३।१ मधील आरक्षण क्र.४।७९, स्मशानभुमी व १२.० मी. रुंद सेवा रस्त्याने बाधित होणारे एकुण क्षेत्र ४३११.२० चौ.मी.**

पूर्व - स.नं. १६ पैकी मिळकत

पश्चिम - लागू मुंबई- पुणे पश्चिम बाह्यवळण रस्ता

उत्तर - स.नं. १७ पैकी अर्जदार यांची उर्वरीत मिळकत

दक्षिण - लागू पवना नदी

परिशिष्ट ८) - **मिळकतीचे वर्णन–** तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे च-होली येथील स.नं. ३८१/१ब पै (जूना स.नं. ४३०) मधील श्री. गणेश हनुमंत ताजणे व इतर यांचे तर्फे कु.मु.धारक सुनिल लक्ष्मण तापकीर यांच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजुर विकास योजनेतील ९०.०० मी. रस्त्याने बाधीत क्षेत्र ५५२८.६२ चौ.मी. जमीन त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

**मौजे च-होली स.नं. ३८१/१ब पै(जूना ४३०) मधील मंजूर विकास योजनेतील ९०.०० मी. रस्त्याने बाधित क्षेत्र ५५२८.६२ चौ.मी.**

उत्तरेस - स.नं. ३८१ पै.

दक्षिणेस - स.नं. ३८१ पै.

पूर्वेस - स.नं. ३८१ पै.

पश्चिमेस - स.नं. ३८१ पै.

## जाहीर नोटीस (२)

सर्व संबधीतांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून विकास हक्काच्या (डी.आर.) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र , गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी ,लीज, लीन, चार्ज , इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हिंतसंबध असल्यास संबधितांने प्रस्तूतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे - ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरुपात दयावी सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबध नाही असे समजून किंवा असल्यास संबधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमीनीचा मोबदला डी.आर. च्या स्वरुपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट -१) मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे दिघी येथील स.नं. ६९/०५ .मधील श्री चिंतामण बाबुराव वाळके व श्री पांडुरंग बाबुराव वाळके यांचे तर्फे कुलमुखत्यारधारक मे. जाधव-देवरे असोसिएट्स तर्फे भागीदार श्री दिलीप बाबुराव देवरे व इतर** यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील आ.क्र ०२/१२४ वाहनतळ ,आ.क्र ०२/ १२३ शापिंग सेंटर कम मार्केट एकूण बाधित **क्षेत्र ४९३.६२ चौ.मी** जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा-- :

**मौजे दिघी येथील स.नं. ६९/०५.मधील आ.क्र ०२/१२४ वाहनतळ ,आ.क्र ०२/ १२३ शापिंग सेंटर कम मार्केट (बाधित क्षेत्र– ४९३.६२ चौ.मी. )**

पुर्वेस- लागू रस्ता
पश्चिमेस- लागु स.नं ६९/०५ पैकीची उर्वरित मिळकत
दक्षिणेस- लागु स.नं ६९/०५ पैकीची उर्वरित मिळकत
उत्तरेस – लागू स.नं ६९/०२ ची मिळकत

परिशिष्ट – २)

**मिळकतीचे वर्णन** - तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मौजे रावेत येथील स.नं.९४ पैकी मधील श्री. सुदाम सिताराम कुंजीर यांचे मिळकतीमधील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील २४.०० मी. रुंद रस्ता या प्रस्तावाने बाधित होणारे एकुण क्षेत्र ४१.०१ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे रावेत येथील स.नं.९४ पैकी मधील बाधित क्षेत्र ४१.०१ चौ.मी. ची चतु:सिमा :

उत्तरेस :- लागू रस्ता
पुर्वेस :- लागू रस्ता
दक्षिणेस :- स.नं. ९४ पैकी मिळकत
पश्चिमेस :- स.नं. ९४ पैकी अर्जदार यांची उर्वरीत मिळकत

परिशिष्ट – ३)

**मिळकतीचे वर्णन** - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मौजे किवळे येथील स.नं.८०/११/१ पै. मधील मे.सुखवाणी चावला इरेक्टर्स तर्फे गुरुमुख जंगलदास सुखवानी यांच्या तर्फे कुलमुखत्यार पत्र धारक मे.नेक्सस ईन्फ्राटेक्ट तर्फे भागीदार श्री.नरेश रावजीभाई पटेल यांचे मिळकतीमधील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रुंद रस्ता या प्रस्तावाने बाधित होणारे एकुण क्षेत्र ११८०.२४ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे - किवळे येथील स.नं. ८०/११/१ पै. मधील१२.०० रुंद रस्ता या प्रस्तावाने बाधित होणा-या

प्रस्तावाची चतु:सिमा: (एकुण क्षेत्र ११८०.२४ चौ.मी.)

उत्तरेस :- स.नं.८० पैकीची मिळकत

पुर्वेस :- स.नं.८० पैकी अर्जदाराची उर्वरित मिळकत

दक्षिणेस :- स.नं.८० पैकी अर्जदाराची उर्वरित मिळकत

पश्चिमेस :- स.नं.८० पैकी अर्जदाराची उर्वरित मिळकत

(राजेंद्र पवार)
उपसंचालक,
नगररचना व विकास विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११०१८

जाहिरात क्रमांक ९२८
दिनांक २१/११/१९

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.